महाराष्ट्र शासन

# विभागीय आयुक्त कार्यालय,छत्रपती संभाजीनगर

## (नगर परिषद प्रशासन )

विभागीय आयुक्त कार्यालय, दिल्ली गेट जवळ, फाजिलपुरा छत्रपती संभाजीनगर -431001

Ph. No.0240-2970507

Email ID:munadmcsndiv@gmail.com

जा.क्र.२०२५/नपप्र/संकिर्ण/कावि-५०१

दिनांक - ०४ /०७/२०२५

**शहर समन्वयक (City Co-ordinator) -स्वच्छ महाराष्ट्र अभियान (ना.) कंत्राटी तत्त्वावरील**

राज्य अभियान संचालक, स्वच्छ महाराष्ट्र अभियान (ना.) यांचे पत्र क्र. राअस/शहर समन्वयक/७९६/ २५-२६ दि.२०/०६/२०२५ मध्ये सुचित केल्यानुसार स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंमलबजावणीसाठी छत्रपती संभाजीनगर विभागातील नागरी स्थानिक संस्थेकरिता (महानगरपालिका वगळून) " स्वच्छ भारत अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी कंत्राटी शहर समन्वयक (City-Co-ordinator) ६४ इतक्या पदावर ११ महिन्याकरिता कंत्राटी तत्वावर नेमण्याकरिता ऑनलाईन पध्दतीने खालील तक्यात नमूद प्रमाणे पात्रता धारण करणा-या इच्छुक उमेदवाराकडून **दि. ०५/०७/२०२५ ते १३/०७/२०२५ संध्याकाळी ६.१५ वाजेपर्यंत** ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहे .

| पदाचे नांव व पदसंख्या | पदे | शैक्षणिक पात्रता | अनुभव निकष (किमान) | वयोमर्यादा व मानधन व कालमर्यादा खालीलप्रमाणे | नेमणुकीचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|
| **शहर** समन्वयक (City-Co-ordinator) | **६४** | बी.ई. / बी.टेक. (कोणतीही शाखा ) बी.आर्क / बी. प्लॅनिंग बी.एस.सी. (कोणतीही शाखा ) | स्थानिक स्वराज्य संस्था (नागरी)कार्यालयाशी निगडीत कामाचा किमान **सहा महिन्याचा अनुभव आवश्यक** | १) वयोमर्यादा:- **कमाल ३५ वर्षे** ( शहर समन्वयक म्हणून अनुभव धारण करणा-या उमेदवारास अनुभवाइतकी वयोमर्यादा शिथील करता येईल)<br>२)मानधन :- प्रति माह **रुपये ४५,०००/-**<br>३) कालमर्यादा - **११ महिने** | कंत्राटी |

## अटी व शर्ती

१. वरील नमूद शैक्षणिक पात्रता व अनुभवाचे निकष पुर्ण केलेल्या उमेदवाराकडून केवळ ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहे. सदर पदांची नियुक्ती केवळ कंत्राटी स्वरुपाची ११ महिन्याकरिता असेल, उमेदवारांना कोणत्याही स्वरुपात शासकीय नोकरीचा दावा करता येणार नाही.

२. ऑनलाईन पध्दतीने खालील लिंकवर अर्ज करावा-
**https://docs.google.com/forms/d/e/1FAIpQLSeMb2Am3Xor63_8WtQJgJWB4MtaS4JO618xSwL_pePqAAVJig/viewform?usp=dialog**

३. ऑनलाईन अर्ज करण्याची शेवटची तारीख १३/०७/२०२५ संध्याकाळी ६.१५ वाजेपर्यंत असेल.

४. प्राप्त अर्जाची छाननी करुन छाननीअंती पात्र उमेदवारांना मुलाखतकरिता उपस्थित राहणे बाबत ईमेलव्दारे कळविण्यात येईल.

५. कंत्राटी शहर समन्वयक यांना वरिल मानधना व्यतिरिक्त कोणतेही शासकीय लाभ प्रत्यक्षपणे अथवा अप्रत्यक्षपणे मिळणार नाहीत अथवा त्यांना कसल्याही प्रकारचे वेतन भत्ते अदा केले जाणार नाहीत.

६. कंत्राटी शहर समन्वयक (City-Co-ordinator)यांचे वेतन नगरपरिषद/नगरपंचायती सतरावर वितरीत केले जाईल.

७. कंत्राटी तत्वावरील शहर समन्वयक (City-Co-ordinator) नियुक्त यांच्या कर्तव्य व जबाबदारी-
(I)शहर घनकचरा व्यवस्थापन कृती आराखडा (CSWAP), शहर स्वच्छता कृती आराखडा (CSAP) तसेच सविस्तर प्रकल्प अहवाल(DPR) तयार करण्यासाठी सहाय्य करणे. (II) प्रकल्पाची अंमलबजावणी विहीत मुदतीत पूर्ण करुन तो शाश्वत व कार्यान्वयन होण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करणे. (III) प्रकल्प आर्थिकदृष्टया शाश्वत राहण्यासाठी वापरकर्ता शुल्क वसुल करणेसाठी पाठपुरावा करणे .(IV)जनजागृती व नागरिकांचा सहभाग वाढविण्यासाठी नियोजन करणे .(V)स्वच्छतम पोर्टलवर दरमहा (MIS) अहवाल अद्ययावत करणे.(VI)माहिती शिक्षण प्रसार व जगजागृती या घटकांतर्गत "कचरामुक्त" शहराचे ध्येय साध्य करण्याकरिता विविध उपाययोजना / कार्यक्रम आयोजित करणे.(VII)दैनंदिन कचरा वर्गीकरण , संकलन तसेच वाहतुक व प्रक्रिया सुरळीत चालण्यासाठी आवश्यक ते नियोजन करणे.(VIII) स्वच्छ भारत अभियान (नागरी) २.० अंतर्गत "कचरामुक्त" शहराचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणे.(IX) स्वच्छ सर्वेक्षणाचे इतर कामे.

८. सर्व शहर समन्वयकाची निवड विभागस्तरावर एकत्रितपणे केली जाईल, तदनंतर प्राधान्यक्रम व उपलब्ध जागा, गुणांकणांप्रमाणे नियुक्ती दिली जाईल. तथापि अंतिम निर्णय प्रशासनाचा राहील.

९. जर अनुभव प्रमाणपत्र खोटे, अपूर्ण, अस्पष्ट किंवा संशयास्पद असल्याचे आढळले आणि तपासणीत हे सिध्द झाले , तर जारीकर्ता आणि प्राप्तकर्ता दोघांवरही कायदेशीर कारवाई केली जाईल आणि उमेदवाराला अपात्र ठरवले जाईल.

१०. सदरची जाहिरात व ऑनलाईन अर्जाची लिंक - विभागीय आयुक्त कार्यालय , छत्रपती संभाजीनगर https://divcomcsn.maharashtra.gov.in/या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

(देविदास टेकाळे)
**सह आयुक्त**
**नगरपरिषद प्रशासन**
**विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर**